# छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन (डिजिटल) व अपलोड करण्याची प्रक्रिया

## छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन (डिजिटल) व अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :

नॉन आधार प्रक्रियेद्वारे ऑनलाईन नोंदणी अर्ज करताना अर्जदाराने खाली दिलेल्या निर्देशांनुसार त्याच्या / तिच्या छायाचित्राची आणि स्वाक्षरीची एक स्कॅन (डिजिटल) प्रतिमा तयार करावी. निर्दिष्ट केलेल्या सूचनांप्रमाणे अर्जदाराने छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करेपर्यंत आपला अर्ज नोंदणीकृत होणार नाही. दिलेल्या निर्देशांनुसार छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर आपला ऑनलाईन अर्ज तात्पुरत्या स्वरूपात नोंदणीकृत होईल.

## टीप:

अ. अर्जदाराचा छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास अर्ज नाकारण्याची शक्यता असेल.

ब. छायाचित्र किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास अर्जदार पुन्हा आपले छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करू शकतात.

## छायाचित्र अपलोड करण्यासंबंधी सूचना:

अ. छायाचित्राचा आकार ५ केबी ते २० केबी दरम्यान असावा.

ब. छायाचित्र JPEG फाईल स्वरूपात असावे.

क. छायाचित्राची रुंदी १६० पिक्सेल असावी

ड. छायाचित्राची उंची २०० ते २१२ पिक्सेल दरम्यान असावी.

**छायाचित्र क्रॉप करण्यासाठी सूचना:**

अर्जदाराकडे दिलेल्या आकारातील छायाचित्र उपलब्ध नसेल, तर आपण खाली दिलेल्या लिंकवर जाऊन छायाचित्र क्रॉप आणि अपलोड करू शकता, त्यासाठी टप्पे पुढीलप्रमाणे :

अ. छायाचित्र क्रॉप करण्यासाठी दिलेल्या लिंकवर क्लिक करा - दिलेल्या बटणाच्या साहाय्याने www.icrop.mahaonline.gov.in या लिंकवर  क्लिक केल्यावर नवीन पृष्ठ प्रदर्शित होईल.

ब. प्रोफाइल फोटो क्रॉप करण्यासाठी "Crop photo" पर्याय निवडा.

क. आपल्या संगणक हार्ड ड्राईव्ह मधून प्रतिमा निवडा व अपलोड फाइल्स वर क्लिक करा

ड. स्क्रीनवर प्रदर्शित झालेल्या प्रतिमेवर बॉक्स क्षेत्र निवडून "Crop Image" वर क्लिक करा.

इ. तयार क्रॉप प्रतिमा जातं करण्यासाठी "Download" बटन वर क्लिक करा.

फ. जतन केलेली प्रतिमा अर्जदारास प्रणालीवर वापरता येईल.